# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडल, औरंगाबाद.

## प्रकरण क्र. सीजीआरएफ/एझेड/शहर/६१९/२०१७/१२

**(नोदंणी क्रमांक २०१७०३०००६)**

तक्रार दाखल दिनांक :- २७.०२.२०१७
निकाल दिनांक :- २५.०४.२०१७

मे. अजितसिंग, तक्रारदार
(किरायेदार : श्री. प्रज्वल दापूरेकर)
हॉटेल रॉयल पॅलेस, जालना रोड,
औरंगाबाद.
(ग्राहक क्रमांक ४९००१०२२८९११)

## विरुध्द

कार्यकारी अभियंता (प्रशासन), गैरअर्जदार
नोडल ऑफिसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म .
शहर मंडल, औरंगाबाद.

## मंच

१ ) डॉ.भास्कर पालवे अध्यक्ष
२ ) श्री. उत्तम.म.उरकुडे सदस्य / सचिव
३ ) श्री. वि. सु. काबरा सदस्य

२/-

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच -निर्णय

अर्जदार मे. अजितसिंग, (किरायेदार : श्री. प्रज्वल दापूरेकर) हॉटेल रॉयल पॅलेस, जालना रोड, औरंगाबाद हे महावितरणचे ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्रमांक ४९००१०२२८९११ असा आहे. त्यांनी गैरअर्जदार कार्यकारी अभियंता, नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे विरुध्द महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ यातील परिशिष्ट -अ नमुन्यात दिनांक २७.०२.२०१७ रोजी तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीचा थोडक्यात तपशिल खालील प्रमाणे आहे.

आमच्या हॉटेलचे विद्युत मीटर जीटीएल कंपनीने दिनांक १७.०१.२०१३ ला बदलले. मीटर बदलण्यापुर्वी आमचा विद्युत वापर अंदाजे ३००० युनिट इतका होता. मीटर बदलल्यानंतर विद्युत वापर बिलानूसार अंदाजे ८००० युनिट दाखविण्यात आला, परंतु लोड व विद्युत वापरण्याचे तास प्रतिदिन प्रति महिना पुर्वी इतकेच होते. जीटीएल कंपनीकडे तक्रार देऊन देखील विद्युत वापरानुसार बिल दिले नाही. महावितरणने जीटीएल कडुन ताबा घेतल्यावर दिनांक २४.०८.२०१६ रोजी आमचे मिटर पुन्हा बदलले. बदललेल्या मीटर नुसार माहे नोव्हेंबर २०१६ चा विद्युत वापर १३१७७ युनिट दाखविण्यात आला. दिनांक २४.०८.२०१६ ते २९.१०.२०१६ या ६७ दिवसांचा विद्युत वापर १३१७७ युनिट असा आहे.

ऑक्टोबर २०१६ मध्ये टेरेसवर २० दिवस वेल्डींगचे काम करण्यात आले. तरी देखील नोव्हेंबर २०१६ या महिन्यात ४०४० युनिट इतकाच वापर आहे. मीटर बदलले तरी थकबाकी भरली गेली नाही म्हणुन महावितरणने दिनांक २४.०८.२०१६ रोजी बदललेले जूने मीटर दिनांक २८.१०.२०१६ रोजी टेस्टींग केले. त्यात मीटर हे १८.०१ टक्के जलद असल्याचे आढळुन आले आहे.

अतिरिक्त कार्यकारी अभियंता, क्रांती चौक यांनी सदरच्या टेस्टींग रिपोर्टवर सही केलेली नाही. अतिरिक्त कार्यकारी अभियंता, क्रांती चौक यांच्या जबाबदारी टाळण्यावर आमचा आक्षेप आहे.

जूने मीटर क्रमांक जीटीएल ८७६४१ हे सदोष असल्याने त्याप्रमाणे वीज वापर सुमारे १८ टक्के कमी होणे आवश्यक आहे. त्यानुसार आमच्या वीज वापरापैकी १७.०१.२०१३ ते २४.०८.२०१६ या ४४ महिन्याचं युनिटस व त्यावरील व्याज कमी होणे न्याय आहे.

आम्ही स्वखर्चाने जीटीएलचे मीटर बसविले आहे. त्याची किंमत आम्हाला रुपये १४०००/- आजपर्यंत महावितरणने परत दिली नाही. त्यामुळे आम्ही खालील प्रमाणे प्रार्थना करीत आहोत.

१) दिनांक १७.०१.२०१३ ते २४.०८.२०१६ या ४४ महिन्यांचे विद्युत वापर १८ टक्के दराने कमी करुन या कालावधीचे विद्युत बील व व्याज दुरुस्ती करुन मिळावी.

२) आम्ही खरेदी केलेल्या मीटरची किंमत आम्हाला परत मिळावी.

३) मागील ४५ महिने विद्युत बील दुरुस्त न झाल्यामुळे आम्हाला मनस्तापापोटी रुपये ५००००/- भरपाई देण्यात यावी.

४) थकबाकीचे बील भरण्यावर त्वरीत स्टे देण्यात यावा.

५) संबंधीतांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

**<u>कार्यकारी अभियंता (प्रशासन), नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे म्हणणे.</u>**

अर्जदाराने मीटर चाचणीसाठी अर्ज केला होता. त्यानुसार मीटर क्रमांक ८७६४२ हे Accucheck द्वारे तपासण्यात आले. चाचणी दरम्यान मीटर व्यवस्थित आढळुन आले. तरी अर्जदाराच्या अर्जानुसार व कार्यकारी अभियंता, शहर विभाग-२, औरंगाबाद यांच्या तोंडी आदेशानुसार उपरोक्त मीटर बदलुन देण्यात आले. ग्राहकाने स्वतः खरेदी केलेले नविन मीटरची चाचणी विभागाद्वारे तपासणी करुन दिनांक २४.०८.२०१६ रोजी बसविण्यात आले. तसेच ग्राहकाच्या विनंतीनुसार जुने मीटर क्रमांक ८७६४२ ची दिनांक २८.१०.२०१६ रोजी मीटर चाचणी विभागामार्फत चाचणी करण्यात आली. चाचणीनुसार जुने मीटर क्रमांक ८७६४२ सुस्थितीत असून त्यामध्ये कोणताही दोष आढळुन आला नाही. त्यामुळे वीज देयका मध्ये दुरुस्ती करण्यात आली नाही. ग्राहकाचे वीज देयक बरोबर असून त्वरीत भरणा करण्याबाबत पत्र क्रमांक १५१६ दिनांक २४.११.२०१६ मार्फत कळविण्यात आले.

..४/-

**ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचे  निष्कर्ष**

१)  अर्जदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे अर्ज केला होता.  मीटर बरोबर असल्या कारणाने अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने अर्ज खारीज केला आहे.

२)  महावितरणने पुन्हा दिनांक १०.०४.२०१७ ला अर्जदाराचे मीटर त्यांचे समक्ष तपासले असून ते सुस्थितीत आहे व त्यात काणेताही दोष आढळलेला नाही.

३)  मीटर मध्ये दोष नसल्या कारणाने विद्युत बील दुरुस्ती करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

४)  महावितरणने अर्जदारास दिलेले मीटर क्रमांक ८७६४२ हे सुस्थितीत असल्याने ते बदलण्याची आवश्यकता नव्हती.  परंतु अर्जदाराचे विनंतीनुसार मीटर बदलण्यात आले ते अर्जदाराने स्वतः विकत आणले होते.  त्यामुळे विद्युत मीटरची रक्कम अर्जदारास परत करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

वरील प्रमाणे अर्जदार, गैरअर्जदार यांचे म्हणणे आणि ग्राहक गाऱ्हाणे मंचाने काढलेले निष्कर्ष याचा विचार करता मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१)  अर्जदाराचा तक्रार अर्ज खारीज करण्यात येत आहे.

२)  अर्जदारास कोणत्याही प्रकारचा खर्च देता येणार नाही.

३)  अर्जदाराकडुन नियमानुसार वीज बिलाची वसुली करण्यात यावी.

४)  केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल ३० दिवसात सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| . डॉ.भास्कर गो.पालवे | उत्तम.म.उरकुडे | विलासचंद्र.सु.काबरा |
| अध्यक्ष | सदस्य/सचिव | सदस्य/सचिव |